महाराष्ट्र शासन
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग, जि. रायगड.**
जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड,अलिबाग.जि.रायगड
Email- deangmcalibag@gmail.com Phone No. 02141-299214 www.gmchalibag.in/gmch

जा.क्र.शावैमअ/आस्थापना-राजप/विनंम / जाहिरात/ ७८९ /२०२५ दिनांक.११/०३/२०२५

## : जाहिरात (Walk-In-Interview):

विषय :- प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, वर्ग -०१ संवर्गातील रिक्त पदे थेट मुलाखतीव्दारे कंत्राटी स्वरुपाने एकत्रित मानधन तत्वावर भरणेबाबत.

संदर्भ :- १.शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७/१२/२०१६

२.वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक एलईसी-२०२१/ प्र.क्र.१९९/वैसेवा-३, दि. ०९/०२/२०२२

३. मा. संचालनालय, मुंबई यांचेअति महत्वाचे पत्रक. संवैशिवसंमुं/ जाहिरात/ करार/ क१/२५९३/२०२३ दि. २५/०८/२०२३

४. शासन निर्णय क्र. एलईसी-१४२४/प्र.क्र. २२८/वैसेवा-३,दि. १८ जुलै, २०२४

५. शासन निर्णय क्र. एलईसी-२०२४/प्र.क्र.१८१/वैसेवा-३, दि. २१ ऑगस्ट, २०२४.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग-रायगड या संस्थेतील खालील नमुद विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक, या पदाचे अर्ज स्विकृत करुन पात्र उमेदवारांचे अर्ज मा. आयुक्त वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या नियुक्तीच्या पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येतील सदर मुलाखतीची तारीख मा.आयुक्त वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या मान्यतेने स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. तसेच वर्ग १ ची पदे शासनाकडून सरळसेवा भरतीव्दारे किंवा बदलीव्दारे नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा संचालनालयातर्फे बंदपत्रित उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत स्थानिक निवड मंडळामार्फत उपरोक्त विहीत कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात प्रचलित नियमानुसार एकत्रित मानधन तत्वावर भरण्याकरिता संस्थेचे वेबसाईट व सुचना फलकावर जाहिरात प्रसिध्द करण्याबबात वरिष्ठ कार्यालयास मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. पात्र उमेदवारांनी अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रासह थेट मुलाखती करिता स्वखर्चाने उपस्थित राहावे, तसेच जे उमेदवार अन्य शासकीय/खाजगी संस्थेत/वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत आहेत त्यांनी संबंधीत संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र व नियुक्ती आदेशांच्या छायांकित प्रती जोडाव्यात.

## प्राध्यापक संवर्गातील भरावयाच्या पदांचा तपशील

| अ.क्र | विभागाचे नांव | शैक्षणिक अर्हता | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| १ | शरीररचनाशास्त्र | राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांनुसार | १ |
| २ | शरीरक्रियाशास्त्र | | १ |
| ३ | सुक्ष्मजीवशास्त्र | | १ |
| ४ | औषधशास्त्र | | १ |
| ५ | जनऔषधवैद्यकशास्त्र | | १ |
| ६ | औषधवैद्यकशास्त्र | | १ |
| ७ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | | १ |
| ८ | मनोविकृतीशास्त्र | | १ |
| ९ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | | १ |
| १० | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | | १ |
| ११ | बधिरीकरणशास्त्र | | १ |
| १२ | क्ष -किरणशास्त्र | | १ |
| १३ | आपत्कालिन औषधशास्त्र | | १ |
| १४ | क्षय उरोरोगशास्त्र | | १ |
| १५ | नेत्रशल्य चिकित्सा | | १ |
| | **एकूण** | | १५ |

## सहयोगी प्राध्यापक संवर्गातील भरावयाच्या पदांचा तपशील

| अ.क्र | विभागाचे नांव | शैक्षणिक अर्हता | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| १ | शरीरविकृतीशास्त्र | राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांनुसार | २ |
| २ | जनऔषधवैद्यकशास्त्र | | १ |
| ३ | औषधवैद्यकशास्त्र | | ३ |
| ४ | शल्यचिकीत्साशास्त्र | | २ |
| ५ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | | १ |
| ६ | बधिरीकरणशास्त्र | | १ |
| ७ | दंतशास्त्र | | १ |
| | **एकूण** | | ११ |

- प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक संवर्गातील पदासाठी अर्ज करण्याच्या उमेदवारांचा अर्जाचा स्विकार करुन पात्र उमेदवारांचे अर्ज मा.आयुक्त,वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडे नियुक्तीच्या पुढील कार्यवाहीकरिता सादर करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.
- तसेच मुलाखती पात्र झालेल्या उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांच्या मान्येतेने स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदाकरिता निवडीची कार्यपध्दती व पात्रता :-**

१)शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक करार पध्दतीने नियुक्तीसाठी कोणत्याही वयोगटाची यथास्थिती भारतीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

२) उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

०३. शैक्षणिक

A ) उमेदवाराने संबंधित विषयातील एम.डी. एम.एस/डी.एन.बी/ ही पदव्युत्तर अर्हता किंवा त्यास समकक्ष पदव्युत्तर अर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठातुन उत्तीर्ण केलेली असावी. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय परिषद व भारतीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांच्या मानंकानुसार अर्हता प्राप्त. (१४.०२.२०२२ च्या अधिसुचनेनुसार)

B ) तसेच उमेदवार भारतीय वैद्यकीय परिषद, १९५६ नुसार नोंदणीकृत असावा. तसेच महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषद १९६५ अन्वये यांच्याकडील वैधताप्राप्त नोंदणी असणे आवश्यक आहे.

C ) भारतीय आयुर्विज्ञान आयोगाच्या दि. १४.०२.२०२२ च्या अधिसुचनेनुसार प्राध्यापक पदासाठी एकूण ०४ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोध निंबध (सहयोगी प्राध्यापक पदावर असताना ०२) व तसेच सहयोगी प्राध्यापक पदासाठी सहाय्यक प्राध्यापक पदावर असताना ०२ राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय शोधनिबंध असणे आवश्यक आहे.

D) भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार उमेदवाराने BCME व BCBR हे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**४) अनुभव :-** प्राध्यापक पदाकरिता भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानांकनानुसार पात्र असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक पदावर कमीत-कती ३ वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

सहयोगी प्राध्यापक पदाकरिता भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानांकनानुसार पात्र असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक पदावर कमीत-कमी ४ वर्षे काम केल्याचा अनुभव असावा.

**५) वयोमर्यादा :-** ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**६) वेतन :-** प्राध्यापक पदाकरिता शा.वै.म.अलिबाग रु. २,००,०००/- करार पध्दतीन दरमहा मानधन तसेच सहयोगी प्राध्यापक पदाकरिता रु.१,८५,०००/- करार पध्दतीने दरमहा मानधन राहील.

७) सदर मानधनाव्यतिरिक्त कोणत्याही स्वरुपाचे भत्ते लागु राहणार नाहीत.

८) **अर्ज सादर करावयाचा कालावधी :-** दि. ११/०३/२०२५ स. ११.०० वाजेपासुन ते दि. २२/०३/२०२५ सायं. ०५ वाजेपर्यंत. कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) महाविद्यालयातील आवक-जावक विभागात स्विकारले जातील.

९) **मुलाखतीचे स्थळ :-** मा. अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग-रायगड यांचे कार्यालय.

## अटी व शर्ती

(शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०२३/प्र.क्र.२१४/वैसेवा-४,दि. १८ जानेवारी,२०२४ मधील तरतुदीनुसार तसेच शासन निर्णय क्र. एमईएस- १५०८/९४/०८/एमईडी,दि. ०७/०९/२०११ हे शासन निर्णय लागु राहील.)

१. करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील.
२. उमेदवारांचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसुचनेशिवाय संपुष्टात येईल.

३. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा व विभागप्रमुख अथवा अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक आहे.

४. वरील प्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबऱ्यांवर विपरित होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५. करार पदध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही तसेच सदर कालावधीत कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

६. करार पदध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमितिक रजा अनुज्ञेय असतील.

७. करार पदध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीना त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

८. करार पदध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

९. उमेदवारास प्रथम नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही.तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपुर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारास करार पध्दतीने नियुक्ती देण्यात यावी. त्यामुळे शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहित विचारात घेता उमेदवारांचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.

१०. बिगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

११. अर्जदारांने संबंधित पदासाठी शारीरिकदृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

१२. सदरील सहयोगी प्राध्यापक पदांची करार तत्त्वावरील पद भरतीच्या जाहिरातीत अशंता:/पूर्णत:बदल करण्याचे अथवा सदरील जाहिरात रद्द करण्याचे सर्वाधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेले आहेत.

१३. नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणे बाबतचे सर्व अधिकार मा.अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग-रायगड यांना राहतील.

१४. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१५. अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ नुसार नोंदणीकृत असावा. महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषद/NMC यांच्याकडील वैधताप्राप्त नोंदणी असणे आवश्यक आहे.

१६. उमेदवारास स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित राहावे लागेल, त्यासाठी कोणत्याही स्वरुपाचा मोबदला दिल्या जाणार नाही.

१७. मुलाखतीला येताना उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुह कागदपत्र सोबत आणणे बंधकारक राहील.

१८. सदरहू जाहिरात ही संस्थेचे अधिकृत संकेतस्थळ www.gmchalibag.in यावर शासन मान्यतेच्या अधिन राहुन प्रसिध्द करण्यात येईल.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग-रायगड